# राज्यातून केळीची निर्यात वाढू लागली

## खानदेशातून रोज पाच कंटेनरची परदेशात निर्यात

ॲग्रोवन वृत्तसेवा

**जळगाव** : राज्यातून केळीची निर्यात वाढू लागली आहे. सध्या राज्यातून रोज २० ते २२ कंटेनर (एक कंटेनर २० टन क्षमता) केळीची निर्यात परदेशात सुरू आहे. त्यात खानदेशातून सध्या पाच कंटेनर केळी परदेशात पाठविली जात आहे. **पान ४ वर »**



**निर्यातक्षम दर्जेदार केळी खानदेशात उपलब्ध झाली आहे. पुढे जळगाव जिल्ह्यातून निर्यात वाढेल. त्यासाठी निर्यातदार कंपन्या दाखल होत आहेत. सध्या खानदेशातून रोज सात कंटेनर केळीची पाठवणूक सुरू आहे.**

**– प्रेमानंद महाजन,** केळी व्यापाराचे जाणकार, जळगाव

### जळगाव जिल्ह्यात शीतगृहाचा अभाव

मागील वर्षीदेखील मार्चमध्ये खानदेशातून निर्यात कमी होती. खानदेशात शीतगृहाची सुविधा नाही. तसेच भाडेदर सोलापूरच्या तुलनेत जळगावातून मुंबईत वाहतुकीसंबंधी एका कंटेनरसाठी ४० हजार रुपये अधिक पडतात. यामुळे निर्यातदारांचा प्राधान्यक्रम सोलापुरला अधिक आहे. १० शीतगृह सोलापुरात आहेत. एका शीतगृहात ५० कंटेनर केळीची साठवणूक करणे शक्य आहे. यामुळे तेथून निर्यात वाढत आहे.

# राज्यातून केळीची निर्यात वाढू लागली

**» पान १ वरून**

केळीच्या निर्यातीस पुढे आणखी गती येईल. कारण आंध्र प्रदेशात निर्यातक्षम केळी कमी झाली आहे. आंध्र प्रदेशात कार्यरत निर्यातदार कंपन्या महाराष्ट्रात दाखल झाल्या आहेत. सोलापुरातून पुढील आठ ते १० दिवसांत निर्यात आणखी वाढेल. सध्या नंदुरबारमधील शहादामधून निर्यात सुरू आहे. जळगावमधील रावेरातून पुढील आठ दिवसांत निर्यात वाढेल. शहादा भागातून रोज तीन कंटेनरची पाठवणूक सुरू आहे. तर जळगाव व धुळ्यातून चार कंटेनर केळी उपलब्ध होत आहे. धुळ्यातील शिरपुरातून रोज दोन कंटेनर केळीची परदेशात पाठवणूक होत आहे. तर जळगाव जिल्ह्यात चोपडा, यावल भागात निर्यातक्षम केळी उपलब्ध होत आहे.

खानदेशात मागील महिन्यात प्रतिदिन तीन कंटेनर केळीची पाठवणूक परदेशात सुरू होती. या महिन्यात प्रतिदिन सरासरी पाच कंटेनर केळीची पाठवणूक झाली आहे. या महिन्याच्या पहिल्या पंधरवड्यात खानदेशात प्रतिदिन तीन कंटेनर एवढीच केळी परदेशात पाठवणुकीसाठी उपलब्ध होत होती. परंतु निर्यातक्षम केळीची उपलब्धता मागील १० ते १२ दिवसांत वाढली आहे.

Agrowon Dt. 30/03/2023

# बाजार समित्यांचे गाळे वाटपासाठी एकसमान धोरण

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

राज्यातील कृषी उत्पन्न बाजार समित्यांमधील गाळे, दुकाने, भूखंड अथवा इतर जागांचे वाटप करण्याबाबत सर्व बाजार समित्यांसाठी एकसमान धोरण असणे आवश्यक आहे. त्यासाठी पणन सहसंचालक विनायक कोकरे यांच्या अध्यक्षते खाली १२ सदस्यीय समिती गठित करण्यात आली आहे. समितीने याबाबतचे धोरण ठरविण्यासाठी स्वंयस्पष्ट अहवाल शिफारशींसह दोन महिन्यांत द्यायचा आहे.

**१२ सदस्यीय समिती दोन महिन्यांत अहवाल देणार**

काही बाजार समित्या पणन संचालकांची परवानगी न घेताच परस्पर त्यांच्या बाजार आवारातील गाळे, दुकाने, भूखंड यांचे वाटप करीत असल्याचेही निदर्शनास येत आहे. काही बाजार समित्यांमधील व्यापाऱ्यांना, अडत्यांना किंवा इतर परवानाधारकांना वाटप केलेले गाळे, दुकाने, भूखंड हे संबंधित व्यक्ती परस्पर इतर व्यक्तींना भाड्याने, पोटभाड्याने देत आहेत आणि या गाळे, दुकाने, भूखंडांमध्ये काही व्यक्ती कृषी उत्पन्नाच्या खरेदी-विक्रीचा व्यवहार करून शेतकऱ्यांच्या शेतमालाची रक्कम न देऊन फसवणूक करीत असल्याच्याही तक्रारी आहेत.

राज्यातील बाजार समित्यांमधील गाळे, दुकाने, भूखंड वाटपाबाबत एकसमान धोरण नाही. त्यामुळे काही बाजार समित्या बाजार आवारातील दुकाने, गाळे, भूखंड हे कृषी उत्पन्नाच्या प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष रितीने खरेदी-विक्रीच्या व्यतिरिक्त इतर कारणासाठी वाटप करीत असल्याच्या तक्रारी पणन संचालनालयास प्राप्त होत आहेत. तसेच अशा वाटपात नाममात्र अनामत रक्कम तसेच नाममात्र भाडे घेऊन वाटप केल्यामुळे बाजार समित्यांचे आर्थिक नुकसान होत आहे.

Pudhari Dt. 30/03/2023

# कोकणचा राजा 'जीआय' नोंदणीत दुसरा

रत्नागिरी : पुढारी वृत्तसेवा

भौगोलिक निर्देशांक (जीआय) मिळालेल्या उत्पादनांमध्ये नोंदणी करण्यात कोकणचा राजा हापूसचा राज्यात दुसरा क्रमांक आहे. डाळिंब पहिल्या, तर द्राक्ष तिसऱ्या क्रमांकावर आहे.

सातासमुद्रापार पोहोचलेल्या कोकणच्या राजाला जीआय मानांकन मिळाल्यानंतर पाच वर्षांनंतर आता खवय्यांच्या पसंतीची पावती मिळाली आहे. आतापर्यंत कोकणातील १ हजार ६२५ बागायतदार आणि प्रक्रियाधारकांनी हापूससाठी नोंदणी केली आहे. हापूस मोठ्या प्रमाणात निर्यात केला जात असून दर चांगला मिळावा यासाठी बागायतदारही जीआयकडे वळत आहेत.

देशात जीआय मानांकन मिळा-



लेली ४२० उत्पादने आहेत. महाराष्ट्रातील ३३ उत्पादनांना जीआय असून त्यात २५ कृषी उत्पादनांचा समावेश आहे. जीआय प्रमाणपत्र देण्यासाठी कोकणातील ३ संस्थांची नियुक्ती केली आहे. त्यामध्ये कोकण हापूस आंबा उत्पादक विक्रेते सहकारी संस्था, केळशी परीस हापूस उत्पादक संघ आणि देवगड तालुका हापूस उत्पादक संस्थेचा समावेश आहे.

आतापर्यंत १ हजार ६२५ आंबा उत्पादक आणि प्रक्रियाधारकांनी जीआय नोंदणी केली आहे. त्यातील कोकण हापूस आंबा उत्पादक संस्थेने ८६६ आंबा बागायतदार आणि १२७ प्रक्रियाधारकांची नोंदणी केली. दरम्यान, जीआय टॅगमुळे कोकण वगळता इतर कोणत्याही आंब्यांना हापूस असे संबोधता येत नाही. यापूर्वी कर्नाटक, आंध्र प्रदेश किंवा गुजरातचा आंबा हापूस म्हणून विकला जायचा. यामध्ये ग्राहकांची फसवणूक होत होती. या प्रकारामुळे कोकणातील हापूस उत्पादकांचे नुकसान होत होते.

मात्र, आता जीआय मानांकनामुळे हापूस उत्पादकांची फसवणूक कमी होत आहे. त्यामुळे चवीने खाणाऱ्या ग्राहकांनी हापूसला दुसऱ्या स्थानांचे मानाचे पान दिले आहे.

Pudhari Dt. 29/03/2023

# पांढऱ्या कांद्यामुळे रायगडच्या शेतकऱ्यांना आर्थिक उभारी

**रायगड : पुढारी वृत्तसेवा**

जीआय मानांकन मिळाल्यानंतर अलिबागच्या पांढऱ्या कांद्याच्या मागणीत मोठी वाढ झाली. तुलनेने उत्पादन कमी असल्याने यंदा किमतीतही ३० टक्के वाढ झाली. दोन माळींच्या एका मणाला ८०० रुपये इतकी किंमत मिळत आहे. पांढऱ्या कांद्याच्या लागवडीमुळे स्थानिक शेतकऱ्यांना आर्थिक उभारी मिळाली.

औषधी गुणधर्म आणि विशिष्ट चवीसाठी अलिबागचा पांढरा कांदा प्रसिद्ध आहे. गतवर्षी या कांद्याला जीआय (भौगोलिक मानांकन) मिळाल्याने मागणी जवळपास ३० टक्क्यांनी वाढली आहे. इतर तालुक्यात तयार होणारा कांदा अलिबागच्या नावाने विकला जात असे. जीआय मानांकनामुळे यावर निर्बंध आले आहेत.

गतवर्षापर्यंत ५०० ते ६०० रुपयांपर्यंत मिळणाऱ्या दोन माळांची किंमत आता ८०० ते १००० रुपयांच्या आसपास आहे. लागवड खर्च भागवून शेतकऱ्यांना चांगला उत्पन्न मिळत असल्याने अनेक प्रयोगशील शेतकरी पांढऱ्या कांद्याची लागवड करीत आहेत. कांद्याचे लागवड क्षेत्र वाढविण्यासाठी कृषी विभागाने आता योजनेंतर्गत शेतकऱ्यांसाठी प्रती हेक्टरी १० हजार रुपयांची आर्थिक मदत जाहीर केली.

## क्षेत्रवाढीसाठी सीडबँकची उभारणी

अलिबाग तालुक्यातील कार्ले, खंडाळा, वाडगाव यांसारख्या गावांमध्ये फक्त २३० हेक्टर क्षेत्रावर पांढऱ्या कांद्याची लागवड केली जाते. कृषी विभागाने सीडबँकेच्या माध्यमातून बियाणे जमवून नव्याने लागवड करणाऱ्या शेतकऱ्यांना बियाणे देण्याचा निर्णय घेतला. यात टप्प्याटप्प्याने वाढ करण्याचा प्रयत्न कृषी विभागाचा आहे.

Pudhari Dt. 29/03/2023

# दोनशे क्विंटलच्या मर्यादेत मिळणार कांदा अनुदान

## तीस दिवसांत वाटपाचे आदेश; पणन संचालक करणार अंतिम यादी

ॲग्रोवन वृत्तसेवा


**मुंबई : राज्यात कांद्याच्या बाजारभावात झालेल्या घसरणीवर उपाय म्हणून जाहीर केलेल्या ३५० रुपयांच्या अनुदानाचे वाटप लवकरच सुरू होणार असून, लेट खरीप कांदा खरेदी केंद्रात विक्री झालेल्या कांद्याला अनुदान देण्यात येणार आहे. २०० क्विंटल प्रतिशेतकरी या मर्यादेत ३५० रुपयांचे अनुदान वाटप केले जाणार असल्याचा शासन आदेश काढण्यात आला आहे. हे अनुदान ३० दिवसांत वितरित करण्याचे आदेश राज्य सरकारने दिले आहे.**

कांदा अनुदानासाठी दोन लाख शेतकरी पात्र ठरतील, त्यांच्यासाठी ३९६ कोटी रुपये अपेक्षित असल्याचा सरकारचा अंदाज आहे.

लेट खरीप हंगामात कांद्याचे भाव प्रचंड कोसळल्याने शेतकरी प्रचंड अडचणीत आला होता. अर्थसंकल्पी अधिवेशनात कांद्यावरून चांगलाच गोंधळ झाला होता. त्यामुळे सरकारने कांद्याचे घसरलेले दर आणि त्यावरील उपाययोजनांसाठी निवृत्त पणन संचालक डॉ. सुनील पवार यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमली होती. या समितीने ३०० आणि २०० रुपये अनुदानाचा पर्याय सरकारपुढे ठेवला होता. यापैकी सरकारने ३०० रुपये अनुदानाची घोषणा केली होती.

दरम्यान, नाशिक येथून भारतीय किसान सभेचा लाँग मार्च निघाला होता. या मोर्चाच्या मागण्यांमधील कांदा अनुदान ही महत्त्वाची मागणी होती. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी या मोर्चाच्या शिष्टमंडळाशी चर्चा करताना अनुदानात ५० रुपयांची वाढ केली होती.

पान ४ वर »



**अनुदानासाठी अटी**

| |
|---|
| २०० क्विंटलपर्यंत प्रतिशेतकरी अनुदान मिळणार. (१ फेब्रुवारी ते ३१मार्च या कालावधीतील) |
| परराज्यातून आवक झालेल्या कांद्याला अनुदान मिळणार नाही तसेच व्यापाऱ्यांना या योजनेचा लाभ मिळणार नाही. |
| डीबीटीद्वारे आयसीआयीआय बँकेमार्फत हे अनुदान शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करण्यात येणार आहे. |
| कांदा उत्पादक शेतकऱ्यांनी कांदा विक्री पट्टी, पावती, सातबारा उतारा, बँक खाते क्रमांक आदी माहिती असलेला साध्या कागदावरील अर्ज विक्री केंद्रावर करावा. |

# दोनशे क्विंटलच्या मर्यादेत मिळणार कांदा अनुदान

» पान १ वरून

त्यानुसार मुंबई बाजार समिती वगळता राज्यातील अन्य बाजार समित्या, खासगी बाजार समित्या पणन विभागाच्या खरेदीदार किंवा नाफेडकडे कांदा विक्री करणाऱ्या शेतकऱ्यांना ३५० रुपये प्रतिक्विंटल अनुदान देण्यात येणार आहे. १ फेब्रुवारी ते ३१ मार्च या कालावधीत लेट खरिपाचा २०० क्विंटलपर्यंतच्या लाल कांद्याला हे अनुदान मिळेल.

**बाजार समिती करणार प्रस्ताव**

शेतकऱ्यांना देण्यात येणाऱ्या अनुदानाचे प्रस्ताव करण्याची जबाबदारी त्या-त्या बाजार समितीची आहे. हे प्रस्ताव पूर्ण करण्याची संपूर्ण जबाबदारी बाजार समितीची आहे. हे प्रस्ताव तालुका सहायक निबंधकांनी तपासून ते जिल्हा उपनिबंधकांकडे जमा करायचे आहेत. तेथे मंजुरी मिळाल्यानंतर पणन संचालकांच्या मान्यतेसाठी ते सादर करावे लागणार आहेत. पणन संचालकांनी ही यादी तपासल्यानंतर अंतिम यादीतील शेतकऱ्यांच्या खात्यावर रक्कम जमा होणार आहे. ही कार्यवाही ३० दिवसांच्या आत करावी लागणार आहे. पात्र शेतकऱ्यांची यादी राज्य सरकारला सादर करावी लागणार आहे.

**सात-बाराधारकाच्या नावेच अनुदान**

अनेक ठिकाणी वाटणीपत्र होऊनही अनेकदा स्वतंत्र सात-बारा नसतो. त्यामुळे विक्रीपावती मुलाच्या नावावर आणि सात-बारा वडिलांच्या नावावर अशी परिस्थिती असते. अशा प्रकरणांत सात-बारा उताऱ्यावर पीक पाहणी नोंद आहे, त्या सात-बाराधारकाच्या नावे रक्कम जमा होणार आहे. मात्र, त्यासाठी वडील, मुलगा किंवा अन्य कुटुंबीयांची सहमती आवश्यक असणार आहे.

Agrowon Dt. 28/03

# रत्नागिरीचा हापूस पोहोचला इंग्लडला

## गुढीपाडव्यादिवशी पुण्यातून १२०० किलोंची निर्यात

**रत्नागिरी :** वातावरणातील बदलांचा परिणाम आंबा उत्पादनावर होत आहे. रत्नागिरीत पहिल्या टप्प्यातील आंबा उत्पादन तुलनेत कमी आहे. तरीही रत्नागिरी हापूस पुण्यातील निर्यातदारांमार्फत इंग्लंडला पोहोचला आहे. गुढीपाडव्याच्या दिवशी १२०० किलो आंबे इंग्लंडमध्ये पोहोचल्याचे तेथील फळ व्यावसायिक तेजस भोसले यांनी 'सकाळ' शी बोलताना सांगितले.

तेजस हे मूळचे पुण्याचे असून गेली अनेक वर्षे इंग्लडमध्ये वास्तव्याला आहेत. आंबा हंगामापूर्वी ते रत्नागिरी, सिंधुदुर्गमधील बागायतदारांना भेट देतात आणि निर्यातीसाठी चर्चा करतात. गतवर्षी ३०० टन आंबे भोसले यांनी इंग्लडमध्ये विक्री केले.

रत्नागिरी हापूसला परदेशामध्ये मोठी मागणी आहे. त्यानुसार भोसले यांनी लवकरात लवकर हापूस इंग्लंडच्या बाजारात नेण्यासाठी प्रयत्न केले होते. पुण्यातील रायसोनी यांच्यामार्फत रत्नागिरीतून १२०० किलो आंबे विमानाने २१ मार्चला रवाना झाले. गुढीपाडव्याच्या दिवशी २२ मार्चला ते इंग्लंडला पोहोचले. डझनला १६ पौंड म्हणजेच भारतीय चलनानुसार १६१० रुपये दर मिळत आहे. गतवर्षीपेक्षा यंदा हा दर चांगला असल्याचे तेथील व्यावसायिकांनी सांगितले.

### हापूसपुढे केसरचे आव्हान

''यंदा हापूसच्या बरोबरीने केसर आंबा बाजारात दाखल झाला आहे. केसरची साल जाड असल्यामुळे त्यावर वातावरणातील बदलांचा तेवढा परिणाम होत नाही. उलट हापूस साका किंवा अन्य कारणांमुळे खराब होण्याची शक्यता अधिक असते. हापूस आणि केसर बरोबरीने निर्यात होऊ लागले तर ग्राहकांकडून तुलना होऊ शकते,'' असे भोसले यांनी सांगितले.



भोसले म्हणाले, ''इंग्लडला निर्यात करण्यापूर्वी कोणतीही प्रक्रिया करावी लागत नाही. फायटो सर्टिफिकेट असेल तर आंबा पाठविता येतो. काही दिवसांपूर्वी भाजीपाल्याबरोबर काही प्रमाणात हापूस येत होता; परंतु मोठ्या प्रमाणात रत्नागिरी हापूस प्रथमच आमच्याकडे दाखल झाला आहे. बागायतदारांकडून दर्जेदार माल मिळाला तर येथील ग्राहकांकडून मागणी वाढत राहील. कोरोनामुळे निर्यातीचे विमान वाहतुकीचे दर किलोला सव्वा दोनशे रुपये घेतले जात होते. यंदा हे दर निम्म्यावर आले आहेत. त्याचा फायदा निर्यातदारासह व्यावसायिकांना आणि शेतकऱ्याला होत आहे. रत्नागिरीतील बागायतदारांशी थेट संवाद साधून जास्तीत जास्त हापूस निर्यात करण्यासाठी आम्ही प्रयत्नशील आहोत.''

Agrowon Dt. 28/03/2023

# कांद्यासाठी ३५० रु. अनुदान फक्त २०० क्विंटलपर्यंतच

## शासन आदेश जाहीर : एक फेब्रुवारी ते ३१ मार्चपर्यंत विकलेल्या कांद्याचा समावेश

**सोलापूर : पुढारी वृत्तसेवा**

कांद्याचे दर पडल्यामुळे शासनाने प्रतिक्विंटल ३५० रुपये अनुदान देण्याची घोषणा केली होती. त्याबाबतचा शासन आदेश आज काढला आहे. त्यामध्ये प्रति शेतकऱ्याने २०० क्विंटलपर्यंत विक्री केलेल्या कांद्याला अनुदान मिळणार आहे. एक फेब्रुवारी ते ३१ मार्च या कालावधीत विकलेल्या कांद्याला अनुदान देण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे.

लेट खरीप हंगामातील लाल कांद्याला दर नसल्यामुळे राज्यभर शेतकऱ्यांनी आंदोलने केली होती. याबाबतचा विषय विधिमंडळात चर्चिला गेला होता. त्यामुळे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी प्रतिक्विंटल ३५० रुपये अनुदान देण्याचा निर्णय घेतला आहे. त्याबाबतचा शासन आदेश आज जाहीर केला आहे. मुंबई कृषी उत्पन्न बाजार समिती वगळता राज्यातील इतर सर्व बाजार समित्यांसाठी ही योजना लागू राहणार आहे. एक फेब्रुवारी ते ३१ मार्च या कालावधीत संबंधित बाजार समिती, खासगी बाजार समिती, थेट पणन अथवा नाफेडकडे कांदा विक्री केलेल्या शेतकऱ्यांना हे अनुदान दिले जाणार आहे. हे अनुदान शेतकऱ्यांच्या खात्यावर थेट जमा करण्यात येणार आहे.

शेतकऱ्यांना अनुदान देण्याचे प्रस्ताव बाजार समितीने तयार करायचे आहेत. हे प्रस्ताव तालुका सहायक निबंधक यांनी तपासून ते जिल्हा उपनिबधकांकडे द्यायचे आहेत. जिल्हा उपनिबंधकांनी योग्य प्रस्तावांना मंजुरी दिल्यानंतर ती यादी पणन संचालकांच्या मान्यतेसाठी द्यायची आहे. त्यांनी तपासून अंतिम केलेल्या यादीस पणन विभागामार्फत थेट लाभार्थी शेतकऱ्यांच्या खात्यावर पैसे जमा केले जातील.

### अनुदानासाठी हे करा



कांदा उत्पादक शेतकऱ्यांनी या योजनेंतर्गत अनुदान मिळविण्यासाठी कांदा विक्री पट्टी-पावती, सात-बारा उतारा, बँक बचत खाते पासबूकसह साध्या कागदावर ज्या बाजार समितीमध्ये कांद्याची विक्री केली आहे, त्याठिकाणी अर्ज करायचा आहे.

### हे असतील निमंत्रक

या योजनेची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी संबंधित कृषी उत्पन्न बाजार समितीचे सचिव, तालुका सहायक-उपनिबंधक व जिल्हा उपनिबंधक हे या योजनेचे लाभार्थी अंतिम करण्यासाठी नियंत्रक म्हणून कामकाज पाहतील. त्यासाठी ते जबाबदार राहतील.

### ३० दिवसांची मुदत

या योजनेसाठीच्या सर्व प्रस्तावांची छाननी करुन जिल्हानिहाय पात्र लाभार्थ्यांची यादी तयार करण्याची कार्यवाही पणन संचालकांनी करायची आहे. बाजार समितीनिहाय लाभार्थी व अनुदान याची एकत्रित माहिती ३० दिवसात शासन सादर करण्याच्या सूचनाही या आदेशाद्वारे दिल्या आहेत.

Pudhari Dt. 28/03/2023

# ‘मॅग्नेट’ला दुसऱ्या टप्प्यात ४८ कोटींचा निधी

ॲग्रोवन वृत्तसेवा

पुणे : शेतीमधील मूल्यसाखळी विकसित करण्यासाठी आशियायी विकास बँकेच्या सहकार्याने राबविण्यात येणाऱ्या महाराष्ट्र ॲग्रीबिझनेस नेटवर्क (मॅग्नेट) प्रकल्पास दुसऱ्या टप्प्यातील ४८ कोटी १८ लाख रुपयांचा निधी नुकताच वितरित करण्यात आला आहे. यामुळे आता या प्रकल्पासाठी सुमारे १०० कोटींचा निधी वितरित झाला असून, या निधीतून आतापर्यंत ३५ प्रकल्पांना मान्यता देण्यात आल्याची माहिती प्रकल्प संचालक दीपक शिंदे यांनी दिली.

पान ४ वर »

## अशी होणार मूल्यसाखळी विकसित

*शेतीमालाच्या काढणीपश्चात तंत्रज्ञानाअभावी होणारे मोठे नुकसान टाळण्यासाठी पॅकहाऊस, प्रतवारी केंद्र, रायपनिंग चेंबर, शितगृह, रेफर व्हॅन, फळे भाजीपाला निर्लजीकरण तंत्रज्ञान, निर्यात सुविधा आदी उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत. यासाठी डाळिंब, केळी, संत्रा, मोसंबी, सीताफळ, पेरू, चिकू, भेंडी, मिरची (लाल आणि हिरवी) व फुले आदी ११ पिकांचा समावेश करण्यात आला आहे.*

## ‘मॅग्नेट’ला दुसऱ्या टप्प्यात ४८ कोटींचा निधी

» पान १ वरून

-आशियायी विकास बँकेच्या सहकार्याने राबविण्यात येणाऱ्या या प्रकल्पातून महाराष्ट्रात विविध जिल्ह्यांमध्ये मूल्यसाखळी विकसित करण्यात येत आहे. या प्रकल्पासाठी राज्य शासन आणि आशियायी विकास बँकेद्वारे १ हजार कोटींच्या निधीची मंजुरी आहे. मात्र काही तांत्रिक बाबींमुळे निधी रखडला होता. मात्र आता हा निधी वितरणास सुरुवात झाली असून, ऑगस्ट २०२२ मध्ये ५० कोटींचा तर २० मार्च २०२३ रोजी ४८ कोटी १८ लाखांचा निधी वितरित करण्यात आला आहे. या प्रकल्पांअंतर्गत ११ फलोत्पादन पिकांच्या मूल्यसाखळी विकसित करण्यासाठी २३० कोटींच्या प्रकल्पांना यापूर्वीच मंजुरी देण्यात आली आहे, अशी माहिती शिंदे यांनी दिली.

Agrowon Dt. 23/03/2023

# सांगलीतून ९ हजार टन द्राक्षे सातासमुद्रापार

## निर्यात वाढण्याची शक्यता; शेतकऱ्यांकडून प्रतिसाद

**ॲग्रोवन वृत्तसेवा**



सांगली : जिल्ह्यात यंदा द्राक्ष पिकास नैसर्गिक आपत्तीचा फटका बसला नाही. त्यामुळे द्राक्ष पीक चांगले असल्याने द्राक्ष निर्यातीस शेतकऱ्यांकडून चांगला प्रतिसाद मिळत असल्याचे चित्र आहे. जिल्ह्यातून आज अखेर द्राक्षाची निर्यात ९ हजार ३६१ टन झाली आहे. निर्यातीचा हंगाम मध्यावर आला आहे. गेल्यावर्षीपेक्षा यंदा द्राक्षाची निर्यातीत वाढ होईल, असा अंदाज कृषी विभागाने व्यक्त केला आहे.

जिल्ह्यातून युरोपसह आखाती देशात द्राक्षाची निर्यात मोठ्या प्रमाणात होत असल्याचे चित्र आहे. तासगाव, खानापूर या दोन्ही तालुक्यांतील शेतकरी द्राक्षाची निर्यात करण्यासाठी पुढे येत आहेत. जिल्ह्यातून गतवर्षी ५ हजार ९४७ शेतकऱ्यांनी १६ हजार ३५८ टन द्राक्षाची निर्यात केली होती. यंदाच्या हंगामात जिल्ह्यातून द्राक्षाची निर्यात वाढवण्यासाठी कृषी विभागाने शेतकऱ्यांमध्ये जागृती केली असून यंदाच्या हंगामात ९ हजार ५१५ शेतकरी द्राक्षाची निर्यात करत आहेत. हंगामाच्या प्रारंभी आखाती देशात द्राक्षाची निर्यात सुरु झाली. त्यानंतर शेतकऱ्यांनी युरोप देशात द्राक्ष निर्यातीस पुढाकार घेतला आहे.

यंदाच्या हंगामात युरोप देशात ३३९ कंटेनर म्हणजे ४ हजार ४२६ टन तर आखाती देशात ३०७ कंटेनर अर्थात ४ हजार ९३५ टन असे एकूण ६४६ कंटेनर म्हणजे ९ हजार ३६१ टन द्राक्षाची निर्यात झाली आहे.

> **यंदा नैसर्गिक संकट नसल्याने पीक चांगले आहे. त्यामुळे द्राक्ष निर्यातीस चांगला प्रतिसाद आहे. गतवर्षीपेक्षा यंदा निर्यात वाढण्याचा अंदाज आहे.**
>
> – प्रकाश नागरगोजे, कृषी अधिकारी (निर्यात) सांगली

Agrowon Dt. 16/03/2023

# ‘ई-फायटो’ वाढवेल निर्यात

**ई:फायटो प्रणालीने निर्यात प्रक्रिया जलद होईल. निर्यातीत सुसूत्रता येईल. निर्यात प्रक्रिया अधिक पारदर्शक होण्यास हातभार लागेल.**

देशातून शेतीमालाची निर्यात वाढत आहे. एप्रिल ते डिसेंबर २०२२ दरम्यान भारतातून ३९ अब्ज डॉलरची शेतीमालाची निर्यात झाली होती. ही निर्यात गतवर्षीच्या याच काळातील निर्यातीपेक्षा (३६.२ अब्ज डॉलर) जवळपास आठ टक्के अधिक आहे. शेतीमालाची आयात निर्यातीपेक्षा अधिक वेगाने वाढतेय. एप्रिल ते डिसेंबर २०२२ मध्ये आपली आयात २७.८ अब्ज डॉलरची होती. ही आयात एप्रिल ते डिसेंबर २०२१ या काळातील आयातीपेक्षा (२४.१ अब्ज डॉलर) तब्बल १५.४ टक्क्यांनी अधिक आहे. खरे तर शेतीमालाची आयात-निर्यात ही त्या त्या देशांच्या गरजेनुसार झाली पाहिजेत. शेतीमालाचे उत्पादन देशांतर्गत गरजेपेक्षा अधिक असेल तर अधिकचा शेतीमाल बाहेर गेला पाहिजेत. तसेच एखाद्या शेतीमालाचे उत्पादन गरजेपेक्षा कमी असेल तर त्याची आयात झाली पाहिजेत. आपल्या देशात मात्र गरज नसताना काही शेतीमाल आयात केला जातो आणि गरजेपेक्षा अधिकचा शेतीमालही निर्बंध लावून निर्यात रोखली जाते. केंद्र सरकारच्या अशा धोरणाचा फटका देशातील खासकरून आपल्या राज्यातील शेतकऱ्यांना अधिक बसत आहे. त्याचे कारण म्हणजे शेतीमालाच्या एकूण निर्यातीत राज्याचा वाटा ६० टक्क्यांहून अधिक आहे. मागील दशकभराचा अनुभव पाहता शेतीमाल निर्यातीत राज्याने चांगली घडी बसविली आहे. शेतीमालाचा दर्जा आणि मानवी आरोग्य सुरक्षितता याबाबतीतही अनेक देशांनी कठोर नियम, निकष, अटी लावल्या तरी त्यांस शेतकऱ्यांपासून या प्रक्रियेतील सर्वच घटकांचा योग्य प्रतिसाद लाभल्यामुळे निर्यातीत राज्याचा दबदबा कायम आहे.

असे असले तरी शेतीमालाच्या निर्यातीत अनंत अडचणींचा सामना शेतकऱ्यांपासून ते निर्यातदारांपर्यंत सर्वांनाच करावा लागतो. निर्यातक्षम शेतीमाल उत्पादनात काही पिके (द्राक्ष, डाळिंब) सोडली तर शेतकऱ्यांना योग्य मार्गदर्शन मिळत नाही. शेतीमाल निर्यातीसाठी काढणीपश्चात (प्रक्रिया-पॅक हाउस) सेवा सुविधांचा अभाव आहे. एकंदरीतच निर्यात प्रक्रिया किचकट आहे. अनेक देश फायटो सॅनिटरी सर्टिफिकेटपासून ते थेट मालाच्या गुणवत्तेबाबत शंका उपस्थित करतात. अशा परिस्थितीत अपेडाने शेतीमाल निर्यातीसाठी ई-फायटो प्रणाली विकसित करून ते एक मार्चपासून देशभर लागू देखील केली आहे. त्यामुळे शेतीमाल निर्यात सेवा जलद व पारदर्शीपणे होतील, असा दावा कृषी विभागाने केला आहे. फायटो सॅनिटरी सर्टिफिकेट हे शेतीमाल निर्यातीसाठी ‘राष्ट्रीय वनस्पती संरक्षण संघटने’कडून प्रदान करण्यात येणारे कायदेशीर दस्तऐवज आहे. निर्यातक्षम शेतीमाल हा घातक कीड-रोगांपासून मुक्त आहे, यासाठी हा दस्तऐवज महत्त्वाचा असतो. कागदोपत्री हा दस्तऐवज काढण्यासाठी वेळ, श्रम आणि खर्चही अधिक लागतो. आता ई-फायटो प्रणालीअंतर्गत हे सर्टिफिकेट निर्यातदारांस लवकर मिळेल. ई-फायटो प्रणालीत आधीच्या प्रमाणपत्रावरील सर्व मजकूर जसाच्या तसा आहे. हे तयार करताना ‘आंतरराष्ट्रीय वनस्पती संरक्षण परिषदे’ने निश्चित केलेली नियमावली व मसुद्याचा वापर करण्यात आला आहे. क्यू-आर कोडचा वापर हा ई-फायटो प्रणालीचे मुख्य वैशिष्ट आहे. याद्वारे निर्यातीचा शेतीमाल कोणत्या देशातूनच नाही तर कोणत्या शेतकऱ्याकडून तो आला (ट्रेसिबिलिटी) हे ग्राहकांना कळते. ई-फायटो प्रणालीने निर्यात प्रक्रिया जलद होईल. निर्यातीत एकप्रकारे सुसूत्रता येईल. निर्यात प्रक्रिया अधिक पारदर्शक होण्यास हातभार लागेल. महत्त्वाचे म्हणजे निर्यातदारांचे श्रम, वेळ, पैसा वाचेल. सध्या फायटो सॅनिटरी सर्टिफिकेट खरे आहे की नाही, अशीही शंका अनेक देशांत उपस्थित केली जाते. ई-फायटो प्रणालीत अशी शंका उपस्थित करण्यास वावच राहणार नाही. आपल्या देशात, राज्यात शासन-प्रशासनाने या प्रणालीची प्रभावी अंमलबजावणी करून निर्यातवृद्धीस हातभार लावावा.

Agrowon Dt. 11/03/2023

# शेतीमाल निर्यातीसाठी 'ई-फायटो' प्रणाली लागू

## प्रमाणपत्रावर 'क्यूआर कोड'ची सुविधा; 'अपेडा'ची मान्यता



> नव्या 'ई-फायटो' प्रणालीमुळे शेतीमालाच्या आयात-निर्यातीमधील सर्व घटकांची सोय होईल. यातील सेवांचा प्रवास जलद व पारदर्शक होईल. क्यूआर कोडचा वापर हा या प्रणालीचे मुख्य वैशिष्ट्य म्हणावे लागेल.
>
> - गोविंद हांडे, निर्यात सल्लागार, कृषी विभाग

अॅग्रोवन वृत्तसेवा

**पुणे : कृषी व प्रक्रियायुक्त अन्नपदार्थ निर्यात विकास प्राधिकरणाने (अपेडा) बहुचर्चित ई-फायटो प्रणाली देशभर लागू केली आहे. यामुळे शेतीमाल निर्यात सेवा जलद व पारदर्शक होतील, असा दावा कृषी विभागाने केला आहे.** **पान ४ वर »**

### ...असे असेल 'ई फायटो सर्टिफिकेट'

- इलेक्ट्रॉनिक्स फायटो सॅनिटरी सर्टिफिकेट तयार करताना 'आयपीपीसी'ने निश्चित केलेल्या मसुद्याचा वापर.
- आधीच्या फायटो प्रमाणपत्रावरील सर्व मजकूर नव्या 'ई-फायटो'मध्ये जसाच्या तसा असेल. हा मजकूर 'एक्सएमएल फॉरमॅट'मध्ये असतो.
- जागतिक स्तरावर संबंधित देशांच्या राष्ट्रीय वनस्पती संरक्षण संघटनांना त्यांच्या सर्व्हरद्वारे ई-फायटो वितरित करण्यास मान्यता.
- 'ई-फायटो' तयार होतानाच त्यात जलद प्रतिसाद संकेतांक अर्थात क्यूआर कोडदेखील तयार होतो. त्यामुळे प्रमाणपत्र वाचन झाले सोपे

# शेतीमाल निर्यातीसाठी 'ई-फायटो' प्रणाली लागू

**» पान १ वरून**

फरिदाबाद येथील 'वनस्पती संरक्षण, विलगीकरण व साठवणूक संचालनालया'ने या प्रणालीला मान्यता दिली आहे. त्यानंतर प्रणालीबाबत 'अपेडा'चे महाव्यवस्थापक यू. के. वत्स यांनी एक सल्ला सूचना जारी केली आहे. त्यात 'फायटो प्रमाणपत्र वितरण यंत्रणांनी एक मार्च २०२३ पासून ई-फायटो प्रणालीत कामे करावीत,' असे सूचित केले आहे. 'राष्ट्रीय वनस्पती संरक्षण संघटने'च्या (एनपीपीओ) तज्ज्ञांकडून गेल्या काही महिन्यांपासून या प्रणालीवर काम सुरू होते. 'ई-फायटो'मुळे निर्यात सेवा जलद होण्यास मदत मिळणार असल्यामुळे निर्यातदारांचेदेखील लक्ष या प्रणालीच्या अंमलबजावणीकडे लागून होते.

शेतीमालाची आयात निर्यात सुरक्षित होण्यासाठी आंतरराष्ट्रीय वनस्पती संरक्षण परिषदेने (आयपीपीसी) नियमावली तयार केली आहे. त्यात 'ई-फायटो'चादेखील समावेश आहे. 'आयपीपीसी'ने तयार केलेली ही प्रणाली आता केंद्र शासनाच्या 'वनस्पती विलगीकरण व्यवस्थापन प्रणाली'शी (पीक्यूएमएस) जोडण्यात आली आहे. हे काम 'एनपीपीओ'ने केले आहे. त्याची चाचणी यशस्वी होताच ही सुविधा देशभर कार्यान्वित केली गेली आहे. त्यामुळे शेतीमाल निर्यातीसाठी अत्यावश्यक असलेले कायदेशीर 'वनस्पतीचे आरोग्यविषयक प्रमाणपत्र' अर्थातच फायटो सॅनिटरी सर्टिफिकेट (पीएससी) आता 'इलेक्ट्रॉनिक' स्वरूपात वितरित होत आहे.

Agrowon Dt. 06/03/2023

# सव्वा लाख टन द्राक्षांची निर्यात


## राज्यातून युरोपला ३८ हजार टन द्राक्षे रवाना

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** यंदाच्या द्राक्ष हंगामात महाराष्ट्रातून जगभरात द्राक्षांची निर्यात सुरू आहे. देशातून आजवर १ लाख २५ हजार टन द्राक्षांची निर्यात झाली आहे. त्यापैकी युरोपला ३८,५५६ टन द्राक्ष निर्यात झाली आहे. द्राक्ष निर्यातीत राज्याचा वाटा जवळपास ९५ टक्क्यांपर्यंत आहे. मार्च, एप्रिल महिन्यांत वेगाने द्राक्ष निर्यात होण्याची शक्यता कृषी विभागाने व्यक्त केली आहे.

देशातून सव्वा लाख टन द्राक्षांची निर्यात झाली असून, प्रामुख्याने बांगलादेशला ३१६५९ टन, संयुक्त अरब अमिरातीला ४७२८ टन, नेपाळला ६४१३ टन आणि रशियाला ११६८ टन द्राक्षांची निर्यात झाली आहे.

युरोपला देशातून ३८.५५६ लाख टनांची निर्यात झाली आहे, त्यात राज्याचा वाटा ३८,५३१ टन इतका आहे. नेदरलँण्डला सर्वाधिक २८७२८ टन, ब्रिटनला ३४०७ टन, जर्मनीला २०१२ टन द्राक्षांची निर्यात झाली आहे.



### बांगलादेशचा १२० टक्के कर

राज्यातील द्राक्षांना बांगलादेशातून मोठी मागणी असते. त्यामुळे राज्यातून सुपर सोनाक्का, आनुष्का आदी वाणांच्या द्राक्षांची बांगलादेशाला निर्यात होते. यंदा बांगलादेशाने शेतीमालाच्या आयातीवर १२० टक्के आयात कर लादला आहे. त्यामुळे हजार रुपयांच्या द्राक्षाच्या क्रेटला १२०० रुपये कर भरावा लागतो आहे. याचा विपरीत परिणाम निर्यातीवर होत आहे, अशी माहिती महाराष्ट्र राज्य द्राक्ष बागायतदार संघाचे अध्यक्ष शिवाजी पवार यांनी दिली.

> बांगलादेशने भारतातून होणाऱ्या कृषीमालाच्या आयातीवरील कर वाढवला आहे. हा अपवाद वगळता जगभरात द्राक्ष निर्यात विनाअडथळा सुरू आहे. मार्च, एप्रिल महिन्यात निर्यातीचा वेग आणखी वाढेल.
>
> - गोविंद हांडे, **निर्यात सल्लागार, कृषी विभाग**

राज्यात नाशिक जिल्ह्याने निर्यातीत मोठी आघाडी घेतली आहे. नाशिकमधून ३५७९९ टन, सांगलीतून १६०२ टन, सोलापुरातून ५७१ टन, नगरमधून २०० टन, पुण्यातून १७३ टन, लातूरमधून ५० तर उस्मानाबादमधून ३२ टन द्राक्षांची निर्यात झाली आहे.

Agrowon Dt. 02/03/2023